**वाचा** : या संचालनालयाचे स्थायी आदेश क्र. ५/२०१७, दि.२७/०२/२०१७.

क्र.स्था.१८/ब/वलेप प्र/जिल्हा कार्यालय/न. क्र.२११/आस्था-५/

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**

**स्थायी आदेश क्र१० /२०१७ दिनांक: 26 MAY 2017**

**आदेश :**

उपरोक्त वाचा मधील आदेशाद्वारे संचालनालयाने जिल्हा कार्यालयातील वरिष्ठ लेखापरीक्षक (प्रशासन) या पदाचा कार्यभार देण्याबाबतची कार्यपध्दती व सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. सदर आदेशातील **(अ) जिल्हा कार्यालयातील वरिष्ठ लेखापरीक्षक(प्रशासन) या पदाचा कार्यभार देण्याबाबतची कार्यपध्दती** मधील अ.क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**अ (२)** वरिष्ठ लेखापरीक्षक (प्रशासन) पदावरील कर्मचाऱ्यास दोन वर्षे कालावधी पूर्ण झाल्यावर किंवा त्याची पदस्थापना बदलीने / पदोन्नतीने अन्य जिल्हयात झाल्यास किंवा तो सेवानिवृत्त झाल्यास वरिष्ठ लेखापरीक्षक (प्रशासन) या पदाचा कार्यभार संबंधित कार्यालयातील इतर वरिष्ठ लेखापरीक्षकांपैकी कार्यकालाने वरिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यास पुढील दोन वर्षांकरीता देण्यात यावा.

**तथापि एखादा वरिष्ठ लेखापरीक्षक विनंती बदलीने संबंधित जिल्हा कार्यालयात हजर झाला असेल तर त्याची प्रथम पदस्थापना वरिष्ठ लेखापरीक्षक (प्रशासन) या पदावर करावी. तसेच संबंधित जिल्हा कार्यालयात एका पेक्षा जास्त वरिष्ठ लेखापरीक्षकांची विनंतीने बदली झाल्यास, सदर वरिष्ठ लेखापरीक्षकांपैकी सेवाजेष्ठतेनुसार वरिष्ठ असलेल्या वरिष्ठ लेखापरीक्षकाची पदस्थापना वरिष्ठ लेखापरीक्षक (प्रशासन) या पदावर करावी.**

सदरचा आदेश दिनांक १ एप्रिल २०१७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहील.

**(प्रताप मोहिते)**
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव :-

१) सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण विभाग, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.
२) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व जिल्हे.

Harshada/ disk-३/ Asb-४/valep prashasan/२६.०५.२०१७